**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,नांदेड**
**दूरध्वनी**:-02462-234668
**संकेतस्थळ:- https://zpnanded.maharashtra.gov.in**
**ई-मेल:** dyceogadzpnanded@gmail.com

जाक्र/जिपनां/साप्रवि/ई-ऑफीस/ E-3456505 /2026 दिनांक:- 13.07.2026

**प्रति,**

1. सर्व विभाग प्रमुख,
   जिल्हा परिषद, नांदेड
2. सर्व गट विकास अधिकारी,
   पंचायत समिती,जिल्हा नांदेड

**विषय :** शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय, आदेश, अधिसूचना, मंजुरीपत्रे व इतर संवेदनशील दस्तऐवज डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (Digital Signature Certificate - DSC) अथवा e-Sign द्वारे निर्गमित करण्याबाबत.

**संदर्भ :** इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.POLICY-2026/C.R.77/TECH/1E-1729104 दिनांक 13.07.2026

संदर्भाधीन शासन निर्देशानुसार शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय, आदेश, अधिसूचना, मंजुरी पत्रे तसेच इतर संवेदनशील दस्तऐवज हे डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (Digital Signature Certificate - DSC) अथवा e-Sign द्वारे निर्गमित करणे आवश्यक करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने, जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत सर्व विभाग प्रमुख, जिल्हा परिषद नांदेड व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,जिल्हा नांदेड यांनी आपल्या कार्यालयातील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी आवश्यकतेनुसार डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (DSC) उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी. ज्या अधिकाऱ्यांकडे DSC उपलब्ध आहे त्यांनी त्याचा नियमित वापर करून शासन निर्णयानुसार महत्त्वपूर्ण व संवेदनशील दस्तऐवज डिजिटल स्वाक्षरीद्वारे निर्गमित करावेत.

तसेच, ज्या कार्यालयांमध्ये अद्याप DSC उपलब्ध नाही, त्यांनी विहित प्रक्रियेनुसार DSC प्राप्त करण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास 7 **दिवसांच्या आत** सादर करावा.

सदर बाब अत्यंत महत्वाची असून शासन निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

Digitally signed by
Rajkumar Vilasrao Mukkawar
Date: 13-07-2026 16:04:34

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
जिल्हा परिषद, नांदेड

प्रतिलिपी,

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. जिल्हा प्रकल्प प्रमुख, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग,जिल्हा परिषद नांदेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव